
नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ९० Issue - 90 | वार रविवार दि. १७ ऑगस्ट २०२५३ Blow- Sunday Date 17 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात वादळी वाऱ्यासह अतिवृष्टी होणार

## हवामान विभागाचा इशारा; पावसामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सध्या राज्यात पावसाचा जोर वाढला आहे. विविध भागात जोरदार पाऊस सुरु आहे. पावसामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. धरणांच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, राज्यात पुढील काही दिवसात १६ ते २१ ऑगस्ट २०२५ दरम्यान अतिवृष्टीसह वादळी वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबईकडून ही माहिती देण्यात आली आहे.

संभाव्य पर्जन्यमान : कोकण व मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी अतिवृष्टीसह अत्यंत अतिवृष्टी होण्याची शक्यता.

मराठवाडा मध्ये काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाची शक्यता. वीज चमकणे, गडगडाट, वादळी वारे (४०) ५० किमी/ताशी) यांची शक्यता.

१६ ते २० ऑगस्ट दरम्यान ५० ते ६० किमी/ताशी वा-यासह समुद्रात खवळलेली स्थिती राहणार असून मच्छीमारांनी या कालावधीत समुद्रात जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सचेत पमार्फत नागरिकांना सूचना आपत्तीपासून सतर्क राहण्यासाठी सद्यस्थितीमध्ये नागरीकांना सचेत पमार्फत अलर्ट संदेश पाठविले जात आहेत. आपत्तीच्या अनुषंगाने प्रशासनातर्फे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थिती करिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

रायगड जिल्ह्यातील अंबा नदीने धोका पातळी तसेच कुंडलीका नदी व रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी आणि कोदवली नदीने इशारा पातळी ओलांडली असून याबाबत नागरिकांना सूचित करण्यात आले आहे. नागरिकांनी पूरस्थिती पासून सुरक्षित राहण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सूचना देण्यात आल्या असून खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

मंत्रालयीन स्तरावरील राज्यस्तरीय आपत्कालीन कार्यकेंद्र २४७ सुरू आहे. मंत्रालय नियंत्रण कक्षासाठी फोन नं. ०२२-२२०२७९९० किंवा ०२२-२२७९४२२९ किंवा ०२२-२२०२३०३९ तसेच मोबाईल - ९३२१५८७१४३ उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचेही राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

राज्यभरात पुढील पाच दिवस पावसाचा जोर वाढणार आहे. विदर्भासह मध्य महाराष्ट्र व कोकणात हवामान विभागाने हाय अलर्ट दिले आहेत. मराठवाड्यात पुढील चार दिवस काही जिल्ह्यात पावसाची हजेरी राहणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा सक्रिय असल्याने महाराष्ट्रात पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागाने वर्तवली आहे.

# नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म्स आणणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आज लाल किल्ल्यावर ध्वजारोहण केले. यावेळी लाल किल्ल्यावरुन नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करताना या दिवाळीत देशवासियांना मोठं गिफ्ट मिळणार असल्याचे सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, या दिवाळीत तुम्हाला खूप मोठी भेट मिळेल. आम्ही एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. आम्ही नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म्स आणणार आहोत. दिवाळीत ही तुमची भेट ठरेल. सामान्य माणसाचे कर मोठ्या प्रमाणात कमी होतील. यामुळे दैनंदिन वस्तू स्वस्त होतील आणि अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल, अशी घोषणा त्यांनी केली आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून जीएसटी कमी करण्याचे संकेत**

पंतप्रधान विकसित भारत योजना आजपासून सुरू

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की, देशातील तरुणांनो, आज मी तुमच्यासाठी आनंदाची बातमी घेऊन आलो आहे. आज १५ ऑगस्ट आहे. आजपासूनच माझ्या देशातील तरुणांसाठी १ लाख कोटी रुपयांची योजना राबवली जात आहे. पंतप्रधान विकसित भारत रोजगार योजना आजपासून सुरू होत आहे. तुमच्यासाठी ही एक मोठी आनंदाची बातमी आहे. या योजनेअंतर्गत, खाजगी क्षेत्रात पहिली नोकरी मिळवणाऱ्या तरुणांना सरकारकडून १५ हजार रुपये दिले जातील, असे त्यांनी यावेळी सांगितले.

आपल्याला सर्व क्षेत्रात आत्मनिर्भर व्हायचंय : पंतप्रधान मोदी

पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी तरुणांना आवाहन करतो की त्यांनी स्वतःचे प्लॅटफॉर्म तयार करावेत. आपण आत्मनिर्भर व्हायला हवं. सध्या आपण खतांसाठी (फर्टिलायझर) इतरांवर अवलंबून आहोत. चला आपण खतांचा साठा करून ही अवलंबित्वाची गरज संपवू. आगामी काळात ईव्ही बॅटरीचा युग सुरू होईल. आपण त्या बॅटऱ्याही बनवू. आम्हाला आमच्या तरुणांवर पूर्ण विश्वास आहे. गेल्या ११ वर्षांत उद्योजकतेला मोठी चालना मिळाली आहे. आज लाखो स्टार्टअप्स देशाला बळ देत आहेत, असे त्यांनी म्हटले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरबाबत वक्तव्य केलंय. ते म्हणाले की, आजचा दिवस एक विशेष महत्त्वाचा दिवस आहे. मला खूप अभिमान वाटतोय की, लाल किल्लवरून मला ऑपरेशन सिंदूरमधील वीर जवानांना सलाम करण्याची संधी मिळाली आहे. आपल्या वीरांनी अशा प्रकारे हे क्षण घडवले की, ते कल्पनेपलीकडचं होतं. ही घटना अशी होती की, पहलगाममध्ये सीमा पारून आलेल्या अतिरेक्यांनी मोठ्या प्रमाणावर नरसंहार केला. लोकांचा धर्म विचारून, ओळखून त्यांची हत्या केली गेली. संपूर्ण हिंदुस्थान या घटनेनंतर संतापलेला होता. आपल्या सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य दिलं गेलं. पाकिस्तानमध्ये जे काही घडलं, त्याचा परिणाम इतका प्रचंड होता की, आजही रोज नवनवे खुलासे होत आहेत, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# उपराष्ट्रपती पदाच्या उमेदवार निवडीसाठी लगबग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : भारतीय जनता पक्षानं उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवार निवडीसाठीची प्रक्रिया वेगवान केली आहे. संभाव्य उमेदवार कोण असेल याबाबत चर्चा सुरु आहेत. पक्षाचे उच्च स्तरीय नेते रविवारी पुन्हा एकदा बैठक घेणार आहेत. या बैठकीत एनडीएचा उमेदवार कोण असणार याबाबत चर्चा होईल. एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार दिल्लीचे नायब राज्यपाल वीके सक्सेना, बिहारचे राज्यपाल अरिफ मोहम्मद खान यांची नावं आघाडीवर आहेत. याशिवाय गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत, कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत, सिक्कीमचे राज्यपाल ओम माथूर आणि जम्मू काश्मीरचे राज्यपाल मनोज सिन्हा यांची नावं देखील चर्चेत आहेत.

राज्यपालांशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सेषाद्री छारी यांचं नाव देखील चर्चेत आहे. राज्यसभेचे उपाध्यक्ष जेडीयूचे नेते हरिवंश यांचं नाव देखील चर्चेत असून आगामी बिहार विधानसभा निवडणुकीनिमित्त त्यांचं नाव चर्चेत आहे. दरम्यान, मागील वेळेप्रमाणं उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार भाजपचा असावा आणि तो भाजपची विचारधारा मानणारा असावा आणि संघाशी संबधित असेल, असे संकेत देत आहेत. साधारण महिनाभरापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची काही राज्यपाल आणि नायब राज्यपालांची बैठक झाली होती.

जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला. यानंतर निवडणूक आयोगाकडून उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तारीख २१ ऑगस्ट आहे. त्यापूर्वी एनडीएला उमेदवार निश्चित करावा लागेल. उपराष्ट्रपतींचं कार्यकाळ ५ वर्षांचा असतो. जगदीप धनखड यांनी वैद्यकीय कारण देत राजीनामा दिला होता. केंद्र सरकारचा न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या विरुद्धचा महाभियोग प्रस्ताव स्वीकारण्यावरुन जगदीप धनखड आणि केंद्र सरकारमध्ये मतभेद झाले होते. एनडीएनं उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार निवडीचा अधिकार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप अध्यक्ष जे.पी. नड्डा यांना दिला आहे. आगामी काळातील निवडणुकींच्या दृष्टीनं विचार करत उपराष्ट्रपती पदाचा उमेदवार निवडला जाऊ शकतो.

एनडीए आणि इंडिया आघाडीचं संख्याबळ भाजपकडे लोकसभेत २४० आणि राज्यसभेत १०२ खासदार आहेत. ससंदेतील एनडीएच्या पक्षांचं मिळून ४५७ खासदार सत्ताधाऱ्यांकडे आहेत. यामुळं एनडीएचे उमदेवार उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळवणार हे स्पष्ट आहे.

# इंदापुर येथे दहीहंडी महोत्सवात सेलिब्रिटी लावणार हजेरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

इंदापूर शहरात भरतशेठ शहा मित्र परिवाराच्या वतीने दहीहंडी महोत्सव आयोजित करण्यात आला असून हजारो गोविंदाच्या उपस्थितीत इंदापूर पोलीस स्टेशन समोर, जुनी कृषी उत्पन्न बाजार समिती प्रांगणात सोमवारी १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७:३० वाजता होणार आहे. यावेळी राजकीय सामाजिक क्षेत्रातील पुणे जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

इंदापूर शहरात दहीहंडी महोत्सवासाठी गोविंदा पथकाची संख्या अधिक आहे. पुणे - सोलापूर व इतर जिल्ह्याच्या ठिकाणी इंदापूरच्या दहीहंडी संघाची कामगिरी लक्षणीय असते.

या गोविंदा संघातील गोविंदा चा खऱ्या अर्थाने आपल्या शहरातील इंदापूरकरांच्या समोर त्यांचा सन्मान व्हावा नवी पिढी जुनी पिढी अशी ऋणानुबंधाची नाळ अधिक घट्ट व्हावी हाच उद्देश समोर ठेवून भरतशेठ शाह व मित्रपरिवाराच्या वतीने हा दहीहंडी महोत्सव ठेवण्यात येतो.शहरात अनेक वेगवेगळे कार्यक्रम पुरुषांसाठी होत असतात. परंतु महिलांसाठी, शालेय विद्यार्थ्यांसाठी भरतशेठ शहा मित्रपरिवार दहीहंडी कार्यक्रम आयोजित करतो.यामध्ये महिलांसाठी खास स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे. दहीहंडी फोडणाऱ्या दहीहंडी संघास रोख बक्षीस देण्यात येते.तसेच सहभागी गोविंदा पथकास योग्य ते बक्षीस व मानपत्र देण्यात येते.

**भरतशेठ शहा मित्र परिवाराच्या वतीने इंदापुर येथे दहीहंडी महोत्सवाचे आयोजन**

यावेळी भरतशेठ शहा मित्र परिवाराच्यावतीने महाराष्ट्राची हास्य जत्रा.फेम प्रसाद खांडेकर, रोहित माने, वनिता खरात, नम्रता सांभेराव या प्रसिद्ध कलाकारांचा विनोदांचा बहारदार कार्यक्रम प्रेक्षक वर्गासाठी आयोजित केला असून प्रसिद्ध सिनेस्टार आणि नृत्यांगना मीरा जोशी यांचा भारदार नृत्याविष्कार कार्यक्रम आयोजित केला आहे. इंदापूर शहरातील व तालुक्यातील नागरिकांनी महिला भगिनींनी या महोत्सवात उपस्थित राहावे असे आवाहन भरतशेठ शहा मित्र परिवाराकडून करण्यात आले आहे.


## अनेक घरातील साहित्य वाहून गेले

## तहसीलदार दिवटे यांनी केली भर पावसात पाहणी

# शिंदीत पावसाचे तांडव, पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी











१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात सकाळी साजरा करण्यात आला मात्र त्या दिवशी सायंकाळी सहा ते सात वाजे दरम्यान सिंदखेड राजा तालुक्यातील शिंदी येथे पावसाने अक्षरशः तांडव केले,

दिड तासात जवळपास ८० मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे शिंदी येथील शेत पिकाचे तसेच गावातील घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले,

शिंदी येथील उत्तम अंभोरे यांच्या घराला अक्षरशा आलेल्या पाण्यामुळे कवेत घेतले व क्षणातच घरातील सर्व वस्तू पाण्याच्या प्रवाहामध्ये वाहू लागल्या सुटकेस टीव्ही स्वयंपाकाचे भांडे संपूर्णपणे पाण्यामध्ये वाहू लागले, घरातील जवळपास सहा क्विंटल गहू पाण्याने ओले चिंब झाले, त्याचबरोबर रमेश तोडे, दिनकर तोडे, देविदास खोसे, मदन तोडे ' रमेश भांड, ग्राहक सेवा केंद्र शंकर सावंत '' सखाराम खंडागळे ' अनिल खंडागळे ' रामेश्वर खंडागळे, जमधाडे, सुमन गवई यांच्या घरामध्ये पाणी घुसून घरातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले,

तसेच पंढरी आटोळे शरद मधुकर खरात, गजानन बंगाळे, नितेश खरात, ज्यांच्यासह शेकडो हेक्टर जमीन पावसामुळे बाधित होऊन जमिनी खरडून गेल्या, त्यामुळे तातडीने सिनखेडराजा तहसीलदार अजित दिवटे तलाठी लखन राजपूत ग्राम विकास अधिकारी दिनकर काळे यांनी भर पावसामध्ये गावातील नुस्कान ग्रस्त भागांची पाहणी केली तहसीलदार अजित दिवटे यांनी ज्या लोकांचे अन्नधान्य वाहून गेले अशांना तातडीने त्यांच्या किराणाची सोय करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या,

संदीप केवट यांच्या दोन दुचाकी वाहून जात होत्या परंतु दोरीने बांधल्यामुळे त्या कशा बशा वाचल्या, त्याचबरोबर शिंदी रताळी रस्त्यावरील संपूर्ण पाणी गावामध्ये येऊन मोठ्या प्रमाणात रस्त्यावर चिखल साचला आहे

त्याचबरोबर वार्ड क्रमांक तीन रमेश भांड यांच्या दुकानाच्या पाठीमागे पावसाचे पाण्याने जवळपास ५० मीटर खोल नाला पडला आहे, तहसीलदार यांनी संपूर्ण भागाचे पाहणी करून सर्वांना मदत कशी मिळेल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले,

तहसीलदार दिवटे यांच्यासोबत मंडळअधिकारी सोळंके , तलाठी लखन राजपूत ग्रामसेवक दिनकर काळे, तलाठी प्रशांत पोंधे, सुभाष तोडे ' तलाठी गिरे, बोरकर ' कृषी सहाय्यक वाघ, गणेश बंगाळे, ज्येष्ठ नागरिक गंभीरराव खरात, सरपंच पती अशोक खरात, माजी सरपंच विनोद खरात, तंटामुक्तीचे अध्यक्ष परमेश्वर खरात, शेषराव बंगाळे, राजू येरमुले, रोजगार सेवक गजानन भांड, ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम खरात, प्रकाश खोसे, पत्रकार सचिन खंडारे कोतवाल शुभम खरात, विजू ठाकूर, निवृत्ती खरात, अशोक बंगाळे, प्रशांत डुकरे, गजानन खरात, यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते .

**दीड तासामध्ये ढग फुटी सारखा पाऊस झाल्यामुळे क्षणातच होत्याचे नव्हते झाले, शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी करण्यात आली त्याचबरोबर घराचेही मोठ्या प्रमाणात पडझड झाली, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल येऊन साचला आहे. पावसाचे पाणी जाण्याकरता नाल्या नसल्यामुळे सदर पाणी शिंदी गावात घुसत आहे, त्यामुळे याकडे सुद्धा लक्ष देणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संभाजी ब्रिगेडच्या केंद्रीय कार्यकारणी व किरण राज घाडगे तर जिल्हाध्यक्षपदी बाळासाहेब बागल यांची निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : संभाजी ब्रिगेडच्या सध्या महाराष्ट्रभर पुनरबांधणी करत आहे. यामध्ये नुकत्याच पुणे येथे झालेल्या बैठकीत किरण राज घाडगे यांची संभाजी ब्रिगेड केंद्रीय कार्यकारणी निवड झाली. सोलापूरजिल्हाध्यक्षपदी व पंढरपूर विभाग जिल्हाध्यक्षपदी बाळासाहेब बागल यांचे एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, व सचिव सौरभ खेडेकर, मुख्य प्रवक्ते प्राध्यापक गंगाधर ननवरे तसेच निरीक्षक म्हणून पुणे विभागाचे अध्यक्ष किरण राज घाडगे, प्रदेश संघटक दिनेश जगदाळे, प्रदेश संघटक सुयोग अगदी कर तसेच राज्य कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

किरण घाडगे ही पंढरपूर येथील रहिवासी असून. बाळासाहेब बागल हे पंढरपूर तालुका गादेगाव येथील रहिवासी असून त्यांनी गेल्या पंचवीस वर्षापासून संभाजी ब्रिगेड मध्ये सक्रिय कार्यकर्ते आहेत.

पुणे विभागीय अध्यक्ष म्हणून शिवश्री किरण राज घाडगे यांनी आतापर्यंत काम पाहिले आहे. गादेगाव शाखाध्यक्ष पंढरपूर तालुकाध्यक्ष म्हणूनही त्यांनी प्रभावीपणे काम केले आहे. त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना जिल्हाध्यक्ष पदाची संधी मिळाली आहे. ह्या निवडीबद्दल सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. यावेळी बोलताना बाळासाहेब बागल म्हणाले की लवकरच या विभागातील पुनर्बांधणी अंतर्गत जिल्हा कार्यकारणी व तालुका कार्यकारणी लवकरच सर्व तालुक्याचा दौरा करून जुन्या नव्या कार्यकर्त्यांना मिळून करणार आहे. शिव शाहू फुले आंबेडकर विचाराचा महासागर संभाजी ब्रिगेडच्या कार्यातून करून गाव तिथे शाखा व घर तिथे कार्यकर्ता अशा प्रकारचे वक्तव्य किरण राज घाडगे यांनी केले. बाळासाहेब बागल यांनी सांगितले. दिनेश जगदाळे, सोमनाथ राऊत, लक्ष्मण ताड, स्वप्निल गायकवाड, आकाश मांडवे, सचिन परांडे उपस्थित होते.

## भारताची फाळणी स्थलांतरित नागरिकांना क्लेशदायक : प्रा. सौरभ भस्मे

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात विभाजन विभीषिका स्मृतिदिनानिमित्त सेमिनार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : भारताला स्वातंत्र्य देत असताना ब्रिटिशांनी भारत पाकिस्तान असे दोन देश निर्माण केले. व्यापक भारताची प्रादेशिक फाळणी केली. त्यानंतर ब्रिटिश मायदेशी निघून गेले. परंतु त्यांनी केलेली देशाची फाळणी स्थलांतरित नागरिकांसाठी क्लेशदायक ठरली. जातीय दंगली उसळल्या अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. अशा विभाजन विभीषिकाची स्मृती अबाधित ठेवणे हीच राष्ट्रप्रेमाची पोचपावती आहे. असे प्रतिपादन राज्यशास्त्र अभ्यासक सौरभ भस्मे यांनी व्यक्त केले.



महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाने विभाजन विभीषिका स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी सेमिनार आयोजित केला होता, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्रा डॉ शितल झिंगाडे उपस्थित होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, भारताची फाळणी झाल्यानंतर नोआखली येथे धर्मावर आधारित जातीय दंगली उसळल्या, महात्मा गांधीजी शांतता प्रस्थापित करण्यासाठी तेथे गेले त्यांनी शांतता व सलोखा प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न केले. परंतु दंगलीत लाखो लोकांनी आपले प्राण गमावले त्यांची आठवण ठेवणे हीच खरे माणुसकीचे प्रतीक आहे. असे सांगत त्यांनी भारताच्या एकतेसाठी सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकत्रित आले पाहिजे असा संदेश दिला.

**शहीद झालेल्या पिडिताना श्रद्धांजली**

**ब्रिटिशांनी विशाल भारताची फाळणी केली, त्यामुळे सीमा भागात जातीय दंगली उसळल्या या दंगलीत शहीद झालेल्या पीडितांना महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापिका मधुबाला लोणारी यांनी केले, आभार प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी मानले यावेळी प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्राध्यापिका शिल्पा धूमशेट्टी, शितल फटाणे, विद्याश्री वाले, जनाबाई चौधरी, प्राची गणाचारी, यांच्यासह सेमिनार साठी १२० विद्यार्थी उपस्थित होते.

## अनंत चैतन्य प्रशालेत गोपाळकाला दहीहंडीचा जल्लोष



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर : श्रावण महिन्यातील कृष्ण पक्षातील अष्टमीला भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला म्हणून हा श्रीकृष्णजन्माष्टमी उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. यालाच गोकुळाष्टमी असेही म्हणतात. आणि याच्याच दुसऱ्या दिवशी म्हणजे नवमीला श्रीकृष्णाच्या बाललीलेचे प्रतीक असलेला व गोकुळात गाई चरायला गेल्यानंतर आपल्या सवंगड्यासोबत स्वतः व गोपालकांनी आणलेल्या भाजीभाकरीचा, शिदोरीचा काला करून केलेल्या सहभोजनाचा एक भाग म्हणून श्रीकृष्णाला आवडत असलेल्या दही, दुध, लोणी चा काला करून व भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा प्रसाद म्हणून हा गोपाळकाला दहीहंडी उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्याची प्रथा आहे. याच औचित्याने आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे गोपाळकाला दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी श्रीकृष्णजन्माष्टमी व गोपाळकाला उत्सव याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यानंतर त्यांच्याच हस्ते बालश्रीकृष्ण मुर्तीचे पुजन करून आरती करण्यात आली. यावेळी श्रवण सोरेगाव ( इ. ५वी),सुरज गर्जे ( इ. ७ वी) ही मुले श्रीकृष्ण व कु. स्वाती धर्मसाले ( इ. ५ वी),आदिती भरमशेट्टी ( इ. ७ वी) या मुली राधा तर साई घोडके ( इ. ८ वी) हा सुदामा बनला होता. यावेळी कु. शिवानी बाळशंकर या इ. ७ वी च्या विद्यार्थिनींने अच्युतम् केशवम् , कृष्ण दामोदरम् या गाण्यावरती सुंदर नृत्य सादर केल्यानंतर दहीहंडी फोडण्याच्या उत्सवास सुरुवात झाली. या साठी इ. ५ वी ते ७ वी लहान गट तर इ. ८ वी ते १० वी मोठा गट असे निश्चित करण्यात आले होते.या दहीहंडी च्या साहसी खेळात मनोरे रचून मुलेच नव्हे तर मुलींच्या ही पथकाने दहीहंडी फोडण्याचा व सहभागी होऊन आनंद लुटण्याचा प्रयत्न केला. मात्र इ. ७ वी च्या लहान गटातील संकेत धर्मसाले च्या गोविंद पथकाने जेंव्हा दहीहंडी फोडले तेंव्हा गोंविदा आला रे, आला असा एकच जल्लोष झाला. तर मोठ्या गटात इ. ९ वी च्या सागर व्हनमाने च्या संघाने व इ. १० वी च्या श्रीशैल मणूरे च्या पथकाने दहीहंडी फोडण्याचा मान पटकावला. हा प्रशालेतील दहीहंडी उत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, सहाय्यिका सौ. स्वप्नाली जमदाडे, जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी, जेष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने , शहाजी माने, सुरेश जाधव, शशिकांत अंकलगे, अब्दुलअझीझ मुल्ला,प्रा. काशीनाथ पाटील, प्र. सहाय्यक स्वामीनाथ कोरे, शिवप्पा घोडके, विश्वनाथ सैदे, जैनुद्दीन जमादार, काशीनाथ हताळे,केदार कोरे यांनी खुप परिश्रम घेतले. हा प्रशालेतील गोपाळकाला दहीहंडी उत्सव व्यवस्थितपणे संपन्न केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मा. श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी सर्वांचे कौतुक केले.

## जावळी येथे श्रावणातील अखंड हरिनाम सप्ताह संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : ह.भ.प गहनिनाथ गोमदे महाराज समदर्गेकर यांच्या सुश्राव्य काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता.

औसा तालुक्यातील जावळी येथे २६ वर्षापासुन अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो. जावळी गाव हे सांप्रदायीक व धार्मिक कार्यात अग्रेसर असलेल गाव मनुन जावळीची ओळख आहे ,सात दिवसीय अखंड हरिनाम सप्ताहात काकडा.ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण ,भागवत कथा व अभ्यासु किर्तनकारांच्या सुश्राव्य वाणितुन किर्तनाचे आयोजन सप्ताहात करण्यात आले होते.

यावेळी जावळी गावात प्रति पंढरपुर प्रमाने भाविकांची गर्दि पहायला मीळाली व मोठ्या भक्तीभावाने महिला व पुरुष भाविकांनी सप्ताहात तल्लीन होउन भगवंताचे नामस्मरण केले यावेळी सुंदर अस साउंड सिस्टीम आपचुंदा येथील जय मल्हार साउंड सर्विसेस यांनी सुंदर अस साउंड सिस्टीम सेवा दीली यावेळी जावळीचे सरपंच सुरेखा मोहन यादव, तंटामुक्ती अध्यक्ष राजाभाउ बोरफळे, चेअरमन काशिनाथ हेंबाडे, जीवन चिंचोले, विठ्ठल थोरात, तुळशिराम आळणे, अंकुश हेंबाडे, विनोद झिरमीरे, संतोष झिरमीरे, राजु मुगळे, विठ्ठल हेंबाडे, बजरंग मुळे, राजु ठमके, आमोल मुगळे, भास्कर मोरे शिवाजी हेंबाडे, नागौराव मुळे, गोपाळ मुगळे, रमेश सुरवसे, शिवकुमार यादव, तुळशिराम आळणे, राजु मुगळे, अंकुश हेंबाडे, काशिनाथ हेंबाडे, उत्तम थोरात, भास्कर मुगळे, रामेश्वर मुळे, तानाजी सुरवसे, अंगद हेंबाडे, शामल मुळे, हनमंत पांचाळ, आविनाश हेंबाडे, श्रीधर कुलकर्णी, माधव गुरुजी आपचुंदेकर, रमेश करनुरे, काका उत्का, शिवाजी शिंदे, भरत महाराज, भागवत गोरे,



प्रताप हांडे, उत्तम पवार रमेश महाराज कन्हेरी, पक्काज वादक साईनाथ शिराढोन, परमेश्वर कदीरे, बालाजी पवार कोमल मुळे, कुमोदिनी कुलकर्णी .अल्का बनसोडे, अजय यादव .पीराजी हांडे, राजाराम मुळे, विश्वंभर हेंबाडे, बबलु हेंबाडे, राजाराम मुळे, द्रोपताबाई हेंबाडे, जयश्री यादव, अनुसया यादव, सह जावळी व परीसरातील भाविकांसह ग्रामस्थ उपस्थीत होते,



## स्वातंत्र्यदिनी मातृशक्तीचा सन्मान - अन्न शिजवणाऱ्या कर्मयोगिनीच्या हस्ते ध्वजारोहण व साडीचोळीचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : १५ ऑगस्ट २०२५ – स्थानिकच्या पंचशील विद्यालय, बाराभाटी येथे यंदाचा ७८ वा स्वातंत्र्यदिन समाजमनाला स्पर्श करणारा ठरला. प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत २००३ पासून केवळ भविष्यात मानधन वाढेल या आशेने, दररोज सुमारे ४०० विद्यार्थ्यांसाठी अल्प मानधनावर निष्ठेने स्वयंपाक करणाऱ्या माता–माऊली श्रीमती मिराबाई चुलपार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रेम, कष्ट आणि सेवाभावाचे हे दर्शन पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचा सन्मान केला.

या उपक्रमाची संकल्पना शाळेचे मुख्याध्यापक श्री. व्ही. एम. चव्हाण यांची असून, श्रमिक व सेवाभावी घटकांचा सन्मान व्हावा, त्यांच्या कष्टाला खरी मान्यता मिळावी आणि शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले जावे हा यामागचा उद्देश आहे. अल्प मानधनावरही निःस्वार्थ सेवा देणाऱ्या या माऊलींना शाळेच्या वतीने साडीचोळी देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी उभे राहून त्यांना मानवंदना दिली. कार्यक्रमात ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, पालक, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पंचशील विद्यालय, बाराभाटीचा आगळावेगळा उपक्रम; ग्रामीण सेवाभावाला टाळ्यांचा सन्मान**

विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीत, रांगोळी, कवायत व रॅलीच्या माध्यमातून हर घर तिरंगाचा संदेश गावोगावी पोहोचविला. या उपक्रमामुळे स्वातंत्र्यदिनाला एक नवा सामाजिक अर्थ व प्रेरणादायी संदेश प्राप्त झाला.

व्ही. एम. चव्हाण यांनी आपल्या मनोगतात सांगितले की – शासन अनेक योजनांमधून महिलांना आर्थिक मदत करते, परंतु प्रधानमंत्री शालेय पोषण आहार योजनेत कार्यरत महिलांना केवळ अडीच हजार रुपये मानधन मिळते. ग्रामीण भागात किमान मजुरी ₹३०० प्रतिदिन आहे. निदान त्याचा विचार करून तरी या माता–माऊलींना आत्मसन्मानाने जगता यावे यासाठी किमान ₹९,००० मानधन शासनाने द्यावे. या योजनेत केंद्र व राज्य शासनाचा सहभाग असल्यामुळे मी देशाचे पंतप्रधान, राज्याचे मुख्यमंत्री तसेच शिक्षण मंत्री यांना विशेष विनंती करतो की, या माता–माऊलींचे मानधन वाढवण्याचा निर्णय तातडीने घ्यावा, जेणेकरून त्यांच्या कष्टाला योग्य आर्थिक सन्मान मिळेल.

## इंदापूर येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर ता. प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टच्या अंकित असणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे आणि मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलाच्या प्रांगणात भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त हवालदार मधुकर जगताप यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.१५) सकाळी ८:१५ वाजता ध्वजारोहण उत्साहात पार पडले. यावेळी ध्वजपूजन सामाजिक कार्यकर्ते माऊली नाचण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माजी नगराध्यक्ष व संस्थेचे दिवंगत अध्यक्ष रत्नाकर (तात्या) मखरेंच्या प्रतिमांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीत विद्यार्थ्यांनी सादर केले.

यावेळी कार्यक्रमास माजी नगरसेविका व संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे (काकी), उपाध्यक्ष तानाजी मिसाळ, सचिव ड.समीर मखरे, संचालक गोरख तिकोटे, राहुल सवणे,संजय कांबळे,डॉ. अनार्या मखरे, गणेश महाजन, अविनाश कोतमिरे, शिवाजी चंदनशिवे, जावेद मुंडे, सुरज धाईंजे, गोरख चौघुले, बापू मखरे व प्राचार्या अनिता साळवे,मुख्याध्यापक साहेबराव पवार तसेच शिक्षक – शिक्षकेतर कर्मचारी, बहुसंख्येने उपस्थित होते.

हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना उपक्रमाचे महत्त्व , ध्वजाबद्दल आदर व्यक्त करणे,दि.१३ व दि १४ ऑगस्ट २०२५ रोजी ध्वजारोहण आणि इतर कार्यक्रम घेतल्याची माहिती नानासाहेब सानप यांनी दिली. सूत्रसंचालन हिरालाल चंदनशिवे यांनी केले.

## जनता विद्यालय नांदुर्डीत स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथिल मराठा विद्या प्रसारक समाजाजे जनता विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक .मुख्याध्यापक. म्हसकर यांनी केले, भारतीय ध्वजाची पूजा, अभिजीत शिंदे यांनी केली आणि ध्वजारोहण रामदास बोराडे यांनी केले, तसेच स्काऊट गाईड ध्वजाचे ध्वजारोहण सुभाष आहेर यांनी केले.

कार्यक्रमासाठी व्यवस्थापण समितीचे अध्यक्ष एकनाथ निकम, लक्ष्मण निकम, सीताराम ढोमसे, आकाश डुंबरे, योगेश निफाड, .संतोष आहेर,एकनाथ कोल्हे, शामराव निकम, शिवाजी निफाडे, दत्तू . आहेर, तानाजी जाधव, गणपतराव ढोमसे, सरपंच सौ. जयश्री ताई जाधव, उपसरपंच लक्ष्मीबाई खापरे, आदेश जाधव, .राजू निकम, जनार्धन कुंभार्डे, गुरूळे साहेब, प्रभाकर निकम, आहेर निकम .जाधव, पालक, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सहकार शिरोमणी साखर कारखान्याचा मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम संपन्न

## कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे व कार्यकारी संचालक प. ज्ञानेश्वर घोगरे यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दहा दिवसात उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणार पी डी घोगरे, कार्यकारी संचालक सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५/२६ च्या २७ च्या गळीत हंगामाचे बिल्डरवरून पूजन कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे व संचालक मंडळाच्या मार्दर्शनाखाली व कार्यकारी संचालक प. ज्ञानेश्वर घोगरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



गळीत हंगाम २०२५ /२६ मध्ये सुमारे साडेपाच लाख टन मॅट्रिक ऊस गाळप करण्याचे संचालक मंडळाने निश्चित केले आहे. त्याच पद्धतीने कारखान्याची मशिनरी ही सर्व कामे करण्यात आले आहे. सर्व कामे अंतिम टप्प्यात आ-लेले असे कार्यकारी संचालक पीडी घोगरे यांनी दिली आहे. एकदा सांगा उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी १९२ ट्रॅक्टर्स, १३० बजेट, तीनशे बैलगाडे,०३ हार्वेस्टर, याप्रमाणे करार करून ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. ऊस पुरवठा करणारे शेतकऱ्यांना उर्वरित दिले दहा दिवसाच्या त्यांच्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येतील असे सांगितले.

एवढी कारखान्याची टेक्निकल मॅनेजर पेटी तुपे, प्रोडक्शन मॅनेजर व्हि. डी अडत, शेती अधिकारी प्यार थोरात, चिप अकाउंटंट बी एस सोनवणे, परचेस ऑफिसर कुंभार, कारण अधीक्षक कुंभार, अभियंता यु.टी. फाटे, विद्युत अभियंता एसएन कुंभार, गोदाम रक्षक केस माने, सुरक्षा अधिकारी बी एस पी सी, कटाई ठेकेदार कर्मचारी अधिकारी सर्व इत्यादी आणि उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्रीकृष्णजन्माष्टमी उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त श्री विठ्ठल सभामंडप येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचे कीर्तन साजरे करण्यात आले. रात्री ११ वाजता श्री विठ्ठलास पोशाख करण्यात आला. त्यावेळी देवास मंदिल (जरीचे ११० हाताचे लाल पागोटे) चांदीची काठी, कुंची असा पोशाख करण्यात आला.

रात्री १२.०० वाजता पुजा-री, उपस्थित मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगावकर), ड माध-वीताई निगडे, सल्लागार परिषद सदस्य ह.भ.प. प्रसाद महाराज अमळनेरकर, सचिन इथापे उपविभागीय अधिकारी पंढरपूर तथा कार्यकारी अधिकारी, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, विभाग प्रमुख संजय कोकीळ, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी यांच्या हस्ते देवाच्या अंगावर गुलाल टाकण्यात आला.

श्री विठ्ठलास सुंठवडा, पेढे, बर्फी प्रसाद दाखवण्यात आला तसेच श्री विठ्ठल सभामंडप येथील पाळण्यामध्ये बाळकृष्ण व नारळ ठेवण्यात येऊन कीर्तनानंतर नारळ सुवासीणीला देऊन उप-स्थित भाविकांना सुंठवडा प्रसाद वाटण्यात आला.

गोकुळाष्टीमीच्या उत्सवानिमित्त भाविक भक्तांनी मोठी गर्दी केली होती. भजन, किर्तन अशा पारंपारिक पध्दतीने गोकुळाष्टमी मंदिरात रात्री उशिरापर्यंत साजरी करण्यात आली.

# सोलापूर जिल्ह्याची माजी आमदार प्रशांत परिचारक यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याची माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या वाढदिवसाचे निमित्त साधून तालुक्यामध्ये गोर-गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, रक्तदान शिबिरे, मूकबधिर मिस्टनभोजन वाटप, तसेच सखुबाई कन्या प्रशाला येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, असे अनेक सामाजिक उपक्रम राबवून तालुक्यात प्रशांतराव परिचारक यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

पंढरपूर पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

एवढी पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे विद्यमान आमदार समाधान दादा अवताडे, यांनी माजी आमदार पचन परिचारक यांना पेढ्यांचा हार घालून सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक विविध संस्थांची पदाधिकारी, विविध सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन, तसेच विनोद राज लटके, माजी नगरसेवक लखन चौगुले, सुनील डोंबे, गणेश उंडाळे, विकी अभंगराव, सतीश चव्हाण, शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या आज वाढदिवसानिमित्त पंढरपूर शहरांमध्ये विविध कार्यक्रम सामाजिक उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला.

# २३ ऑगस्ट रोजी आमदार नारायण (आबा) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : करमाळा मतदार संघाची विद्यमान आमदार नारायण आबा पाटील यांच्या दिनांक २३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या वाढदिवसाच्या निमित्ताने विविध सामाजिक उपक्रम आयोजित केल्याची माहिती वाढदिवस संयोजन समितीच्या वतीने देण्यात आली. यामध्ये बुधवार दिनांक २० ऑगस्ट रोजी चिकलठाण येथे ग्रामपंचायतच्या वती-ने मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. बुद्ध आणि हॉस्पिटल पुणे यांच्या वतीने हे मोफत आरोग्य शिबिर घेतले जात आहे. या शिबिरामध्ये रक्तामधील साखरेची मोफत तपासणी करून घरच्या घरी शुगर तपासणी करणारी डिजिटल मशीन डायबेटिक रुग्णांना वाटण्यात येणार आहे. तर दिनांक २१ रोजी कुर्डूवाडी येथे रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. कुर्डूवाडी येथील डॉक्टर भारत पाटील फाउंडेशन व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा रोजगार मेळावा होत आहे. सदर मेळावा गणेश हॉल (वांगळे हॉस्पिटल शेजारी) येथे होणार आहे तर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष वारे यांच्या वतीने मूकबधिर विद्यालय करमाळा, श्रीदेवीचा मळ येथील मोहबदरी विद्यार्थ्यांना स्नेहभोजन व रावा या करमाळा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वही वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे आमदार नारायण आबा पाटील मित्र मंडळ व वन विभाग करमाळा यांच्या वतीने तारुण्यातील गायरान फॉरेस्ट मध्ये ५००० पक्षाचे रोपण करण्यात येणार आहे. तर दिनांक २३ ऑगस्ट रोजी जेऊर येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप शिबिर आयोजित करण्यात आले आहे तसेच भव्य रक्तदान शिबिर घेतले जाणार आहे. दिनांक २३ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता जेऊर येथे आमदार नारायण आबा पाटील यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे या शिवाय करमाळा मतदार संघात विविध ठिकाणी ग्राम स्तरावर शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, खाऊ वाटप, अनेक सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अशी माहिती आयोजन समितीने दिली यावेळी सभापती अतुल भाऊ पाटील, माजी सभापती गहिनीनाथ ननावरे, युवा नेते पृथ्वीराज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष वारे, हो पाटील गटाचे मार्गदर्शक प्राध्यापक अर्जुनराव सरक, आमदार नारायण आबा पाटील मित्र मंडळ तालुका अध्यक्ष डॉक्टर प्राध्यापक संजय चौधरी, बहुजन संघ समितीचे अध्यक्ष व आदिनाथ संचालक राजाभाऊ कदम, संचालक रामेश्वर तळेकर चिकलठाण सरपंच विकास गलांडे, माजी सरपंच राजू शेठ गादिया, जेऊर उपसरपंच नागेश झांजुर्णे, सदस्य संदीप कोठारी, उमेश कांडेकर, संतोष वाघमोडे माजी सरपंच किरण पाटील, आमदार नारायण आबा पाटील सोशल मीडिया तालुकाप्रमुख संजय फडतरे, राहुल घाडगे सूर्यकांत पाटील, सुनील तळेकर ,आदी जण उपस्थित होते.

# महापालिकेत कमळ फुलण्यासाठी तयार राहा: भाजप कार्यालयात जयकुमार गोरे यांनी साधला संवाद







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : ७९ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर कार्यालय येथे आयोजित केलेल्या झेंडावंदन सोहळा पार पडल्यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी माहे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची चहा पाणी घेत संवाद साधला.

याप्रसंगी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भाजप कार्यकर्त्यांच्या पाठीशी मी भक्कमपणे उभा असून, आपल्या शहराध्यक्ष या अत्यंत धाडसी व शिस्तीच्या असून त्यांनी केलेल्या मागणीप्रमाणे आपल्या समस्या सोडण्यासाठी मी सदैव तत्पर असल्याचे सांगत भाजप कार्यालयात माझ्या दौऱ्यात एक तास संघटनेसाठी देणार असल्याचे सांगितले व येणाऱ्या पालिका निवडणुकीत भारतीय जनता पार्टीचा कमळ पालिकेवर फुलवायचे प्रतिपादन केले.

सदर प्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, भारतीय जनता पार्टीचे सर्व शहर पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, मोर्चा आघाडी प्रकुष्ट अध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# डुबेरे जनता विद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव विविध उपक्रमांनी उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त ' हर घर तिरंगा ' हा उपक्रम शासकीय आदेशानुसार विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. दि.१३ ऑगस्ट रोजी विद्यालयाचे प्राचार्य रंगनाथ उगले यांच्या हस्ते तर दि.१४ ऑगस्ट रोजी विद्यालयाच्या वरिष्ठ लिपिक राणी शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . दि.१५ ऑगस्ट रोजी उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे तर स्काऊट-गाईड ध्वजाचे ध्वजारोहण शालेय समितीचे अध्यक्ष नारायण शेठ वाजे यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी घोषणा देत ढोल ताशाच्या गजरात संपूर्ण गावा-तून प्रभात फेरी काढण्यात आली. विद्यार्थ्यांच्या हातात तिरंगा ध्वज होते. विद्यालयात आकर्षक सजावट करण्यात आली. स्काऊट मास्टर मारुती डगळे,जयश्री गोहाड,कल्पना शिंदे व क्रीडाशिक्षक शिवाजी गुरु-ळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊट -गाईडच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून ध्वजाला मानवंदना दिली. रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.सिन्नरच्या पहिल्या नगराध्यक्ष मथुराबाई वाजे यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. प्राचार्य रंगनाथ उगले यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्व-ागत केले. उपशिक्षिका जयश्री गो-हाड यांनी शासनाच्या आदेशानुसार अंमली पदार्थ विरोधी शपथ ग्रामस्थ,विद्यार्थी व शिक्षक यांना दिली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर व तालावर पंचरंगी कवायत सादर केली. तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी साक्षी गोफणे व यश वाघ तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परी-क्षेत यश मिळणाऱ्या गौरी वाजे व आरोही जाधव. आदी विद्यार्थ्यांचा सत्कार व गौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. इस्रो येथे वैज्ञानिक सहलीसाठी देणगी देणारे संदेश वाजे व विशाल वाजे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प.समितीचे माजी उपसभापती शंकरराव वामने,श्रीमंत थोरले बाजीराव पतसंसंस्थेचे व्हा. चेअरमन अरुण वारुंगसे,काशिनाथ वाजे,दामोदर कुंदे, सरपंच रामनाथ पावसे,उपसरपंच सोनाली वारुंगसे,अशोकराव गवळी,अर्जुन वाजे, शरद माळी, अनिल वारुंगसे, विजय वाजे ,कारभारी वारुंगसे,संदेश वाजे, भाऊ वारुंगसे ,पत्रकार सुनील जाधव, तलाठी सत्यम चौधरी ,पोलिसपाटील रामदास वारुंगसे,अर्चना ढोली, प्राचार्य रंगनाथ उगले,पर्यवेक्षिका जयश्री पगारे आदींसह ग्रामस्थ उप-स्थित होते. सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी तर आभार सांस्कृतिक समिती प्रमुख सुनिल ससाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी शिक्षक, शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले.यावेळी शालेय समितीचे सदस्य, ग्रामपंचायतीचे सदस्य, विविध संस्थेचे पदाधिकारी, विविध मंडळाचे पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थ, संस्थेचे सभासद, हितचिंतक व देणगीदार उपस्थित होते.

## पावसाच्या जोरदार तडाख्यामुळे अनेक नद्यांना पूर ; बचाव कार्य सुरु

# कळंब तालुक्यात मुसळधार पावसाचा अक्षरशः हाहाकार; अनेक शेतकऱ्यांचे नुकसान!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे, : तालुक्यातील ईटकुर, कन्हेरवाडी, कोठाळवाडी, वाकडी या परिसरात तीन चार दिवसांपासूनच वादळी वाऱ्यासह पाऊस पडत गेला होता मात्र गुरुवार दिनांक १४ ऑगस्ट रोजी दिवस रात्रभर कोसळलेल्या मुसळधार पावसाने अक्षरशः हाहाकार माजवला आहे. कळंब तालुक्यातील खोदला गावात तर आलेल्या पुराने नदीच्या पुलावरून जाणारे शेतकरी पाण्यात अडकलेले असून त्याच्या बचावासाठी प्रयत्न सुरू होते यावेळी तुळजापुरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील तसेच कळंब - धाराशिवचे आमदार कैलास पाटील घटनास्थळी दाखल झाले होते त्यांनी बचावकार्य गतिमान करण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते पावसाच्या जोरदार तडाख्यामुळे अनेक नद्यांना पूर आला असून रस्ते ठप्प झाले होते. कळंब,वाशी तालुक्यातील अनेक प्रकल्प ओसंडून वाहू लागले आहेत धाराशिव तालुक्यातील तेरणा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे, तर भूम तालुक्यातील संगमेश्वर व पाथरूड मध्यम प्रकल्पही ओसंडून वाहू लागले आहेत त्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे या मुसळधार



पावसामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. अनेक घरांची पडझड होऊन शेकडो कुटुंबांचा संसार उघड्यावर आला आहे. शेती पिकासह सौरऊर्जा पंपाचे मोठ्या प्रमाणा-वर नुकसान झाले आहे अनेक प्लेटाना तडे गेले असुन शेतकरी विशाल विलास मिटकरी यांच्यातर शेतातील सौरपंपाचे तर अतोनात नुकसान झाले आहे असे शेतकरी विशाल मिटकरी यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना माहिती देताना सांगितले आहे तसेच जनावरांच्या जीवित हानीची भीती शेतकऱ्या मधुन व्यक्त केली जात आहे वाशी तालुक्यातील वशिरा नदीला जोरदार पाणी आल्याने पूल वाहून गेला आहे त्यामुळे पावसामुळे तालुक्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. गावोगावी वीजपुरवठा खंडित झाला अनेक ठिकाणी रस्ते खचले असून पूलावरून पाणी वाहत असल्याने वाह-तूक पूर्णपणे ठप्प झाली होती. प्रशासन आपत्ती व्यवस्थापन पथके,पोलीस व स्थानिक नागरिक मिळून बचाव कार्य करत होते तसेच नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून गरज पडल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे व जिल्ह्यातील हवामान खात्याने पुढील २४ तासासाठीही अतिवृष्टीचा इशारा दिल्याने प्रशासन अलर्ट मोडवर असून संभाव्य धोक्याचा सामना करण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत अशी माहिती मिळाली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सक्रिय सहभाग घेऊन गावे आत्मनिर्भर करावीत : पालकमंत्री जयकुमार गोरे

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणात आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**■ राज्य शासनाने नुकताच मंत्रिमंडळ बैठकीमध्ये उडान योजनेअंतर्गत व्हायाबिलिटी गॅप फंडिंगची तरतुद करुन सोलापूर-पुणे-मुंबई विमानसेवा सुरु करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.**

**■ राज्यातील महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सन २०२५-२६ पासून आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार**

**■ जिल्ह्यात हर घर तिरंगा मोहिमेतून राष्ट्रभावना जागृत ठेवण्याचे कार्य केले जात आहे**

**■ या वर्षाच्या आषाढी वारीमध्ये सहभागी होणा-या सर्व वारकरी भाविकांसाठी गुणवत्तापूर्वक सेवा सुविधा उपलब्ध केल्याने ही वारी शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख व्यवस्थापनाचा एक उत्कृष्ट नमुना ठरली आहे.**

■ आजपासून स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर उपक्रमाची घोषणा.



सोलापूर/जिमाका : ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागात केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामविकास विभागाने या वर्षापासून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी तसेच नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन गावे आत्मनिर्भर करावीत, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, राज्य राखीव दलाच्या समादेशक डॉ.दिपाली काळे, केगाव पोलिस प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य विजयकुमार चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह अधिकारी, कर्मचारी तसेच स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, सोलापूरच्या सर्वसामान्य नागरिक, उद्योजक, व्यापारी आणि लोकप्रतिनिधींच्या विमानसेवेच्या दीर्घकालीन मागणीला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य शासनाने नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये उडान योजनेअंतर्गत व्हायाबिलिटी गॅप फडिंगची तरतुद करुन सोलापूर-पुणे-मुंबई विमानसेवा सुरु करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. हा निर्णय सोलापूरच्या औद्योगिक, व्यापारी आणि पर्यटन सेवा क्षेत्राला नवी दिशा देणारा आहे.

तसेच ग्रामविकास विभागाच्या वतीने रक्षाबंधनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्ह्यात उमेद अंतर्गत १४ कोटी रुपये थेट महिला बचत गटांच्या बँक खात्यावर वितरित करण्यात आले. आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन जिल्ह्यात मोठया प्रमाणावर लखपती दीदी निर्माण होतील. श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी, अरण तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी १५० कोटींच्या विकास आराखड्याला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर यांचे भव्य स्मारक उभारणीसाठी शासनाची कृष्ण तलावाची जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतलेला आहे, अशी माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली.

पंढरपूर शहरामध्ये आषाढी वारीच्या अनुषंगाने स्वच्छतेचे नवीन आयाम निश्चित केले. त्याच धर्तीवर स्वच्छ सोलापूर सुंदर सोलापूर हे अभियान आजपासून एक वर्षासाठी घोषीत करीत आहे. या अभियानामध्ये सर्व घटकांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा. तसेच सोलापूर शहराच्या सन २०५७ पर्यंतच्या पाणी गरजांचा विचार करून महाराष्ट्र राज्य नगरोत्थान योजनेअंतर्गत 'सोलापूर सिटी वॉटर सप्लाय स्कीमला' शासनाने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. ह्या प्रकल्पातून सोलापूर शहरातील नागरिकांना सातत्यपूर्ण, गुणवत्तापूर्ण आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. शहरातील सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्गीकरण, संकलन आणि अंतिम विल्हेवाट सुनिश्चित केले जाणार आहे, असे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वासाठी घरे हे स्वप्न असून हे स्वप्न साकारण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रशासनाकडे विशेष पाठपुरावा करुन राज्यासाठी ऐतिहासिक ३० लक्ष घरे मंजूर करून घेतली व यामध्ये सोलापूर जिल्हयाला ५० हजार घरकुले मंजूर आहेत.तसेच सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेसाठी एकूण ९३५ कोटी निधी मंजूर झाला असून या निधीच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकासकामे हाती घेण्यात येत असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजन समिती कटिबद्ध असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

राज्यातील महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी सन २०२५-२६ पासून आदिशक्ती अभियान राबविण्यात येणार असून, महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांवर संवेदनशीलतेने उपाययोजना करण्याचा या मोहिमेचा उद्देश आहे. ग्रामस्तरीय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आदिशक्ती पुरस्कार देऊन समित्यांचा गौरव केला जाणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन महिला सक्षमीकरणासाठी योगदान द्यावे असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

आजचा सोलापूर हा केवळ ऐतिहासिक नव्हे तर विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा जिल्हा आहे. शासनाच्या विविध योजनांमुळे जिल्ह्यातील प्रत्येक क्षेत्रात सकारात्मक बदल घडत असून सोलापूर जिल्हा हा भविष्यात महाराष्ट्रातील एक आदर्श जिल्हा म्हणून ओळखला जाईल. आपल्या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी, सामाजिक समरसतेसाठी आणि राष्ट्रहितासाठी एकजुटीने कार्य करण्याचा या स्वातंत्र्य दिनी आपण सर्वांनी एक संकल्प करण्याचे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान क्रांतिकारक व स्वातंत्र्य सेनानी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांना अभिवादन केले. सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सेनानी यांनी दिलेल्या योगदानाचा उल्लेख केल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास पूर्ण होऊ शकत नसल्याचे सांगून सन १९३० मध्ये सोलापूर ने चार दिवस स्वातंत्र्य उपभोगले होते याची माहिती दिली. तसेच अनेक ज्ञात अज्ञात शूरवीरांचे बलिदान हे सोलापूरच्या स्वातंत्र्यलढ्याचे तेजस्वी प्रतीक असून हा इतिहास आजही सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर ध्वजारोहण समारंभास उपस्थित असलेले सर्व स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पालक, पत्रकार यांच्या सदिच्छा भेटी घेऊन स्वातंत्र्य दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा त्यांनी दिल्या. यावेळी सर्व उपस्थित नागरिकांनी तंबाखू मुक्तीची शपथ घेतली. यानंतर पालकमंत्री महोदय यांच्या हस्ते विविध विभागांचे पुरस्कार वितरण संपन्न झाले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# नंगपुरामुर्री निवासी शाळेत स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : तालुक्यातील नंगपुरामुर्री अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेत स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. तसेच विविध स्पर्धा व कवायती सादर करण्यात आल्या.

**कवायत संचालन : विविध स्पर्धा सादर**

यावेळी मुख्याध्यापक रविशंकर इठुले यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी साधना पारधी, नीता भलमे, पी ए लांजेवार, ए एम शाहारे, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, की आर महाजन आदी उपस्थित होते.

सकाळी ०७.३० वाजता स्वातंत्र्य दिन वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात आले. यावेळी राष्टगीत, राज्य गीत, झेंडा गीत सादर करण्यात आले. तसेच डंबेल्स कवायत, लेझीम कवायत, तसेच मनोरा सादरीकरण करण्यात आले. एकल नृत्य व सामुहिक नृत्य तसेच एकल गीत व सामुहिक गीत सादर करण्यात आले.

अशाप्रकारे विविध स्पर्धा, कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. उत्तम सादरीकरण केल्याबद्दल कौतुक करण्यात आले.

# निफाड येथील कर्मवीर मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय निफाड येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरा केला गेला.

मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या शुभहस्ते ध्वजाचे पूजन आणि ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर शालेय समितीचे अध्यक्ष डॉ. उत्तम डेर्ले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, माधवराव गीते, जानकीराम धारराव, अशोक कुंदे, रमेश जाधव, अशोक वडघुले, यशवंत वडघुले, छोटू पानगव्हाणे, भाऊसाहेब कापसे, सुधाकर कापसे, रामनाथ धारराव, बाळासाहेब सानप, सुनील वडघुले, तुषार खालकर, योगेश कुंदे, संदीप गाजरे व मान्यवर उपस्थित होते.

एन सी सी केडेट ने खूपच शिस्तबध्द असे संचालन करत मान्यवरांना मानवंदना दिली. यावेळी महाराष्ट्र शासन पोलिस अधीक्षक कार्यालय नाशिक, यांनी आदेशित केल्याप्रमाणे ध्वजारोहना नंतर अंमली पदार्थ विरोधी शपथ वाचन केले गेले, आणि ही शपथ सर्वांनी सामूहिक स्वरूपात घेतली.

निफाड महाविद्यालयाचे माजी खेळाडू मयूर वनसे, ऋतिक परदेशी, आदित्य जाधव, सुमित भोई, सागर आहिरे, प्रवीण शेळके यासर्वांची महसूल सहाय्यक पदी मुंबई मंत्रालय येथे नियुक्ती झाली त्याबद्दल या सर्वांचा यथोचित सन्मान मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

त्याबरोबरच एनसीसी बेस्ट केडेड म्हणून आदित्य मत्सागर, वैष्णवी लगडे, ऋतुजा शिंदे यांचा सन्मान करण्यात आला.

शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य योगेश सुधाकर कुंदे यांनी कै. सुधाकर कुंदे आणि कै. विमलाबाई कुंदे यांच्या स्मरणार्थ ११ वी. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या एकूण २४ गरजू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करून, उपस्थितांना दातृत्वाची प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार चंद्रशेखर मोरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी उपप्राचार्य डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. अभय वडघुले, डॉ. सुसान लॉरेन्सिया, प्रा. योगेश कडलग, अधीक्षक संजय गायकवाड, प्रा. शंकर गायकवाड, प्रा. चेतन कुंदे, श्रीमती सविता कापसे, श्रीमती मनीषा कोटकर सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्राध्यापिका आणि शिक्षकेतर सेवक सर्वांनी परिश्रम घेतले.



# भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणीमातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारतीय स्वातंत्र्याच्या वर्धापन दिनानिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस पारंपारिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये श्री विठ्ठलास सोने मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्ट्या जोड, हि-याचा कंगन जोड, मोत्याचा तुरा, शिरपेच, मत्स्य जोड, अष्टपैलू मण्याची कंटी, तोडे जोड, चंद्रहार, पदकासह लॉकेट, मोहनमाळ, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, तुळशीची माळ तसेच श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान आले आहेत.

## सरपंच वनिता सुरवसे यांच्या हस्ते ग्रामपंचायत व उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते जि.प. शाळेत ध्वजारोहण



# गोगांव येथे ७९ वा स्वातंत्र्योत्सव उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : ग्राम पंचायत गोगांव येथे ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी गोगांव गावचे सरपंच सौ.वनिता मधुकर सुरवसे यांच्या हस्ते ग्रामपंचायत समोर ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी ग्रा. सदस्य सदस्य प्रदीप जगताप होते, डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन शेतकरी दयानंद जिरगे व नबीलाल नदाफ यांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळा गोगांव येथे उपसरपंच श्री कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याठिकाणी कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी ग्राम पंचायत अधिकारी विक्रम घाटे हे होते.प्रतिमा पूजन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुधीर जगताप व कुमार सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी आरोग्य उपकेंद्र गोगांव वतीने तंबाकू विरोधी शपथ घेण्यात आले. शालेय मुला मुलींना पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती गोगांव, सरपंच वनिता सुरवसे, सिद्धार्थ सोशल फौंडेशन वतीने खाऊ व फळे वाटप करण्यात आले.

यावेळी सरपंच वनिता सुरवसे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, सदस्य प्रदीप जगताप, लक्ष्मण बिराजदार, ललिता कलशेट्टी, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड, डॉ. लिंगराज नडगेरी, कल्याणराव बिराजदार, निवृत्ती सुरवसे, सुरेश सोनकांबळे, शरणपा कलशेट्टी, मुख्याध्यापक पुंडलिक वाघमारे, शंकर कारभारी, भोसले मॅडम, डॉ लिंगराज नडगेरी, आरोग्य सेविका आंबिका वळसंग, मधुमती गायकवाड, आरोग्य सेवक राकेश चव्हाण, परमेश्वर गायकवाड, शरण कुरणे, सूर्यकांत जिरगे, आकाश गायकवाड, यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.